**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1425/2007.**

श्री अरविंद लक्षमीनारायण जैस्वाल
बजार चौक मु. पो. सिंदेवाही
त. सिंदेवाही जि. चंद्रपूर 441 222. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) सौ. भारती झाडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उप मुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ)
स्थानिक विधी लेखा, म. रा.
लेखा व कोष भवन, 3 रा मजला,
जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नागपूर

2) श्री गजानन बोकडे
जन माहिती अधिकारी तथा
उप मुख्य लेखा परिक्षक
स्थानिक विधी लेखा, चंद्रपूर म. रा.
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.7.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.4.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 19.12.2006 रोजी उप मुख्य लेखा परिक्षक तथा माहिती अधिकारी स्थानिक निधी लेखा, चंद्रपूर यांचेकडे 1) श्री अशोक कुर्झेकर हयांना ग्रा. पं. सिंदेवाही व पं. स. सिंदेवाही येथुन दि. 30.6.2005 ला भारमुक्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक 1.1.05 ते 8.7.05 पर्यंत आर्थिक व्यवहार केले ते नियम योग्य की नियम बाहय हयांची माहिती.

2) ग्रा. पं. सिंदेवाहीचे सन 2005–2006 या आर्थिक वर्षाचे संपूर्ण योजनेची लेखा परिक्षणाची प्रत मिळण्याबाबत.

भारमुक्त झाल्यानंतर ग्राम विकास अधिकारी हयांनी केलेले आर्थिक व्यवहार व संपुर्ण योजने निहाय केलेले लेखा परिक्षणची प्रत मिळणे प्रकरणी. माहितीचा कालावधी सन 2005–2006 या आर्थिक वर्षातील. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केले दिसून येते. सहपत्र सोबत 1) ग्राम विकास अधिकारी हयांचे आदेशाची प्रत दि. 30.6.2005 2) ग्राम विकास अधिकारी हयांनी श्री अशाक कुर्झेकर हयांना भारमुक्त केल्याची प्रमाणपत्र 3) ग्राम विकास अधिकारी हयांचे चौकशी अहवालाची प्रत. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 6.1.2007 रोजी उप मुख्य लेखा परिक्षक यांनी अपीलकर्ता यांना माहिती क्र. 1 मागितलेली माहिती माहितीच्या अधिकारात येत नाही. माहिती क्र. 2 हया कार्यालयातून संबंधित संस्थेचे लेखा परिक्षण पूर्ण करुन संबंधित संस्थेचा अहवाल पुढील कार्यवाहीसाठी सादर केला जातो. ग्राम पंचायत सिंदेवाहीच्या अनुषंगाने लेखा परिक्षण करुन ग्राम पंचायतचा अहवाल व संवर्ग विकास अधिकारी पं. स. सिंदेवाही यांना सादर केलेला आहे. सदर अहवालाची छायांकित प्रत सचिव ग्रा. पं. सिंदेवाही यांचेकडुन प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 24.1.2007 रोजी प्रथम अपीलीय

अधिकारी तथा उप मुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ) यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 2.2.2007 रोजी जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही याबद्यल वरिष्ठ कार्यालयामध्ये विचारणा केली होती व त्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे अपीलकर्ता यांना कळविलेले होते. त्यानंतर दि. 17.2.2007 रोजी उप मुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ) सरपंच ग्रा. पं. यांना ग्रा. पं. सिंदेवाहीच्या लेखा परिक्षणाची प्रत अपीलकर्ता यांना पुरविण्यात यावी असे कळवून सोबत अपीलकर्ता यांचा अर्ज सहपत्र म्हणून हस्तांतर करण्यात आला होता. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. तसेच संवर्ग विकास अधिकारी पं. स. सिंदेवाही यांना सुध्दा सचिव ग्रा. पं. सिंदेवाही यांना ग्रा. पं. लेखा परिक्षणाची प्रत श्री जैस्वाल यांना पुरविण्याचे निर्देश त्यांचे पत्र क. 67/2007 दि. 22.2.2007 नुसार दिले. त्याचप्रमाणे ग्राम विकास अधिकारी ग्रा. पं. सिंदेवाही यांनी त्यांचे पत्र क. 359 दिनांक 27.4.2007 अन्वये अपीलकर्ता यांना सदर अहवालाची त्यांचेकडून प्रत स्विकारण्याची विनंती केली. तसेच श्री जैस्वाल यांचे अभिप्रायाचे मागणी प्रमाणे ग्रा. पं. च्या सचिवाच्या आर्थिक व्यवहाराचे अभिप्राय त्यांना या कार्यालयाने पत्र क. 258 दि. 17.2.2007 नुसार कळविलेले आहे. त्याप्रमाणे दि. 15.3.2007 नुसार अपीलकर्ता यांनी पुन्हा विचार करण्याबाबतचा अर्ज सादर केला. उपरोक्त पुनर्विचार अर्जाच्या अनुषंगाने दि. 22.3.2007 अन्वये ग्रा. पं. चा लेखा परिक्षण अहवाल ही बाब सर्वस्वी ग्रा. पं. च्या अखत्यारीतील आहे. लेखा परिक्षण अहवाल सुध्दा त्यांचे मार्फतच प्रकाशीत करणे अभिप्रेत असल्याने अहवाल प्रत ग्रा. पं. कडून प्राप्त करुन घेणे योग्य होईल असे कळविण्यात आले. त्याचप्रमाणे ग्रा. पं. च्या लेखा परिक्षण अहवालाबाबत या कार्यालयाचे सन 1996–97 ते 2005–06 या 10 वर्षाचे लेखा परिक्षण प्रलंबित असल्याने त्यांचे एकत्रितपणे लेखा परिक्षण केल्यानंतर विभागाचे नियमानुसार त्यांचा एकच लेखा परिक्षण अहवाल तयार

करण्यात येवून तो संबंधित संस्थाना सादर करण्यात आला. अपीलकर्ता यांनी 2005–06 या एकाच वर्षाच्या लेखा परिक्षण अहवालाची प्रतीची मागणी केली आहे. त्यामुळे ती पुरवणे उपरोक्त बाबीमुळे शक्य नाही. वरील तपशिलावरुन असे स्पष्ट होते की अपीलकर्ता यांना माहिती नाकारण्याचा कोणताही हेतू या कार्यालयाचा नाही. एखाद्या संस्थेचे होणारे लेखा परिक्षण या विभागाकडून होत असले तरी लेख परिक्षणासाठी उपलब्ध होणारे अभिलेख हे त्या संस्थेचे असल्याने लेखा परिक्षण अहवाल सर्वस्वी त्यांचे अखत्यारीतील बाब आहे असे या कार्यालयाचे मत आहे. परंतु संस्थे मार्फतच लेखा परिक्षण अहवाल प्रकाशीत करण्यात यावे असे संकेत आहे अशा संस्थेच्या अनुमतीविना लेखा परिक्षण अहवाल दुस–या कार्यालया मार्फत परस्पर तिसरे व्यक्तीस देणे योग्य ठरणार नाही. अर्जदारास लेखा परिक्षण अहवालाची प्रत पुरविण्या संदर्भात एका अन्य प्रकरणात राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद यांचे दि. 29.11.2007 च्या निर्णयानुसार तक्रारदारास लेखा परिक्षण अहवालाची प्रत पुरविण्या संबंधीच्या व मुंबई स्थानिक विधी लेखा परिक्षण अधिनियम 1930 चे कलम 8 मध्ये माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीचा लक्षात घेवून योग्य ती दुरुस्ती करण्यास आदेशीत केल्याप्रमाणे मा. मुख्य लेखा परिक्षक व स्थानिक निधी लेखा म.रा.नवी मुंबई यांचे पत्र क्र. 81 दि. 14.1.2008 मधील सुचनेप्रमाणे मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम योग्य ती सुधारणा सुचविणारा प्रस्ताव या कार्यालया मार्फत पत्र क्र. 401 दि. 19.3.2008 अन्वये सादर केलेले आहे असा खुलासा त्यांनी सादर केला आहे.

3. अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जामध्ये मुद्दा क्र. 1 मध्ये ग्राम सचिव भारमुक्त झाल्यानंतर दि. 1.7.2005 ते 8.7.2005 पर्यंत जे आर्थिक व्यवहार केले ते नियम योग्य की नियमबाहय याची माहिती मागितली त्याबाबत मुद्दा माहितीच्या अधिकारात येत नाही असे जे उत्तर दिले आहे त्याकरीता ''माहिती'' व ''माहितीचा अधिकार'' या दोन संज्ञांची व्याख्या तपासणे आवश्यक आहे. अधिनियमाच्या कलम 2 (च) प्रमाणे ''माहिती'' या

संज्ञेचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई–मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिद्धिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल) कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री असा असून (ञ) ''माहितीचा अधिकार'' याचा अर्थ, कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळवण्याचा अधिकार, असा आहे आणि त्यात –

(एक) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे,

(दोन) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे,

(तीन) सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे,

(चार) डिस्केट्स, फ्लॉपी, टेप, व्हीडीओ कॅसेट या स्वरुपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठविलेली असेल त्याबाबतीत मुद्रित प्रती (प्रिंट आऊट) मार्फत माहिती मिळविणे, याबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की माहितीच्या व्याख्येमध्ये अभिप्राय असल्यामुळे त्यांना अभिप्राय उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. परंतु साहित्याच्या स्वरुपात याचा अर्थ अभिप्रायाच्या प्रतीच्या स्वरुपात असा आहे व त्यामुळे अभिप्रायाची प्रत असली तरी त्याची छायांकीत प्रत घेणे असा त्याचा अर्थ होतो. जन माहिती अधिकारी हे अधिनियमाच्या कलम 5 प्रमाणे त्या त्या सार्वजनिक प्राधिकरणामध्ये किंवा त्या खालील अनेक विभागामध्ये ज्या स्तरावर माहिती उपलब्ध असेल त्या त्या स्तरावर माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केलेले असतात. त्यामुळे संबंधित माहिती अधिकारी यांचेकडे जी माहिती उपलब्ध असेल त्या कागदपत्राच्या किंवा अभिलेखाचे ते परिरक्षक असतात त्यामुळे उपलब्ध असलेल्या प्रकरणातील कोणत्याही निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये त्या त्या माहिती अधिका–याचे अभिप्राय घेणे हे अपेक्षित नाही परंतु त्या निर्णय प्रक्रियेतील अधिकारी असेलच असे

नाही. व त्यामुळेच जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकरणाच्या संदर्भात अभिप्राय अपेक्षित नाही त्यामुळे अपीलकर्ता यांनी आर्थिक व्यवहार योग्य आहे किंवा अयोगय याबद्यलचे मत विचारलेले हे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे योग्य आहे.

4. मुद्या क्र. 2 मधील आर्थिक व्यवहाराचे संपूर्ण योजनेचे लेखा परिक्षणाची माहिती ही निश्चितच अपीलकर्ता यांना अहवालाची प्रत प्राप्त करुन घेण्याचे अधिकार आहे परंतु जी माहिती ज्या सार्वजनिक प्राधिकरणाची असेल त्या सार्वजनिक प्राधिकरणाकडूनच उपलब्ध करुन घेणे अपेक्षित असल्यामुळे ते सार्वजनिक प्राधिकारणाच्या जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करावयास पाहिजे. एखाद्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या संदर्भामध्ये अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे दुस–या सार्वजनिक प्राधिकरणातील वैधानिक काम सोपविले असले तरी त्या बाबतची माहिती अर्थातच ही मुळ सार्वजनिक प्राधिकरणाकडूनच उपलब्ध करुन घेणे अपेक्षित असते व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेले लेखा अहवाल हया ग्राम पंचायतकडून उपलब्ध करुन घ्यावी त्याबद्यल जो निर्णय दिलेला आहे तो योग्य आहे. त्याकरीता त्यांनी तशा प्रकारचे संकेत आहे असे खुलाशात म्हटलेले आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना संकेत हे कशा वरुन ठरविण्यात आले अशा प्रकारे त्यांना विचारले असता त्यांनी मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 (मुंबई अधिनियम क्र. 25/1930) च्या तरतुदी आयोगाच्या निदर्शनास आणल्या. सदरच्या अधिनियमाचा उद्येश हा बृहन्मुंबई व्यतिरिक्त महाराष्ट्र राज्यात असलेल्या विवक्षित स्थानिक प्राधिकरणांच्या व्यवस्थापनाखाली किंवा नियंत्रणाखाली असलेल्या स्थानिक निधींची लेखापरीक्षा करण्यासाठी तरतूद करणे व अशा लेखापरीक्षेचे नियमन करणे असा आहे. व त्याप्रमाणे स्थानिक प्राधिकरणाच्या लेखा परिक्षेची जबाबदारी ही लेखा परीक्षक यांचेवर दिलेली आहे. सदरच्या अधिनियमाच्या कलम 9 प्रमाणे मुख्य लेखा परिक्षकाने आपल्या निर्णयाचा अहवाल आयुक्तांकडे

पाठविला पाहिजे आणि अशा अहवालाची एक प्रत त्याने सभापतीकडे पाठविली पाहिजे व अशा प्रतीत अहवालाचा जेवढा भाग पोट कलम 4 प्रमाणे प्रसिध्द केला पाहिजे तो विशेषेकरुन निर्दिष्ट केले पाहिजे जर कोणतेही आदेश किंवा नियमबाहयता दुरुस्त करण्यात आली नाही अशा मुख्य लेखा परिक्षकाने निर्णय घेतला तर त्याने आपल्या अहवालात असे दोष किंवा नियमबाहयता आपल्या मते यथानियम सुधारता येवू शकतील किंवा कसे इत्यादी बाबत अहवालात नमुद केले पाहिजे. याचा अर्थ संबंधित प्रकरणाला तो अहवाल मुख्य लेखा परिक्षकाने पाठवावयाचा असून कलम 4 (4) मध्ये संबंधित प्राधिकरणानी प्रसिध्द करावयाच्या आपल्या पुढील प्रशासनिक अहवाललात पाट–कलम 2 खंड (क) खाली येणारे दाष किंवा नियमबाहयता यांच्या संबंधी कलम 8 अन्वये केलेल्या अहवालात जेवढा भाग असेल तेवढा भाग पोटकलम (1) अन्वये त्याबाबत कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले असेल तर ते स्पष्टीकरण पोट कलम (3) खाली त्यासंबंधी मुख्य लेखापरीक्षकाने सादर केलेला अंतिम अहवाल यासह प्रसिध्द केला पाहिजे. व तो मिळाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या मुदतीपर्यंत स्थानिक प्राधिकरणाच्या कार्यालयात सर्व लोकास पाहण्यास खुले असले पाहिजेत. अशा प्रकारची तरतुद असल्यामुळे सदर अहवाल प्रसिध्द करण्यापूर्वी उपलब्ध करुन देणे व तेही दुस–या सार्वजनिक प्राधिकरणातील अधिका–यानी उपलब्ध करुन देणे हे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की काही वेळेस स्थानिक प्राधिकरणाच्या उपलब्ध झालेल्या अभिलेखामधून लेखा परिक्षेच्या अहवालात काही बाबी येतातच असे नाही व त्यामुळे लेखा परिक्षण कार्यालयाच्या अहवालाची प्रत व प्राधिकरणाने प्रसिध्द केलेली अहवालाची प्रत हया तपासून पाहण्याकरीता त्यांना मागितलेल्या प्रतिची जन माहिती अधिकारी तथा लेखा परिक्षण अधिकारी यांचेकडून प्रत उपलब्ध करुन दिल्यास त्यांचा हेतू साध्य होईल. त्याकरीता ज्या प्राधिकरणाच्या लेखा

परीक्षेचा अहवाल मागितलेला आहे त्या प्राधिकरणानी जर तो अहवाल प्रसिध्द केला असता तर लेखा परीखकानी केलेल्या अहवालाची प्रत उपलब्ध करुन देण्यास कोणतीही हरकत असण्याचे कारण नाही. परंतु ते प्राधिकरणाने प्रसिध्द केला नसल्यास मात्र त्या अहवालाची प्रत ही लेखा कार्यालयातून उपलब्ध करुन देता येणार नाही त्याकरीता जन माहिती अधिकारी तथा उप मुख्यलेखा परिक्षक यांनी ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत सिंदेवाही यांचेकडून अपीलकर्ता यांनी मागितलेला अहवाल प्रसिध्द झाला असल्याची खात्री करुन घेणे संयुक्तिक राहिल. व त्यानंतर त्यांचे कार्यालयातील अहवालाची प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना दि. 19.12.2006 च्या अर्जात मुद्या क. 2 मध्ये ग्रामपंचायत सिंदेवाही सन 2005–2006 या वर्षाचे संपूर्ण यांजनेची लेखापरीक्षेच्या अहवालाबाबत ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत सिंदेवाही यांचेकडून प्रसिध्द केल्याबद्यल माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे सदरचा अहवाल ग्रामपंचायत

10

सिंदेवाही यांनी प्रसिध्द केला असल्यास सदरच्या अहवालाची लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा यांचे कार्यालयातील अहवालाची छायांकित प्रत अपीलकर्ता यांना रजिस्टर पोष्टाने विनामुल्य हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. 7.7.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.